दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २३७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२७ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# जेएनपीटी-पनवेल महामार्गावर कंटेनर ट्रेलरचा अपघात

## केमिकल वाहून नेणारे कंटेनर फुटल्याने केमिकल रस्त्यावर

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण तालुक्यातील चिर्ले व धुतुम गावाजवळ असलेल्या जेएनपीए - पनवेल महामार्गांवर काल शनिवारी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता दोन कंटेनर ट्रेलरचे अपघात झाल्याने एक केमिकल कंटेनर जागेवरच उलटला. केमिकलचा कंटेनर उलटल्याने त्यातून धुर बाहेर पडू लागले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ अग्निशमन दलाला पाचरण केल्याने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही.**




मात्र कंटेनर मधून केमिकल धूर बाहेर पडत असल्याने या महामार्गावरील वाहतूक काही काळ बंद ठेवण्यात आली होती. महामार्ग बंद ठेवल्याने जवळपास ५ किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सदर वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आलि होती.एकंदरीत परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

या अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा अवैध वाहतूक, बेकायदेशीर पार्किंगचा मुद्दा पुन्हा एकदा एरणीवर आला आहे.

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी बेकायदेशीर पार्किंग मोठ्या प्रमाणात आहे. मुख्य रस्त्यावर वाहने वेडी वाकडे करून वाहने लावण्याचे प्रमाण अधिक आहे. रस्त्यावर वाहने अवैध पणे वेडी वाकडी कसेही उभे केले जातात.

त्यामुळे या मार्गावर अनेकदा लहान मोठे अपघात झालेले आहेत. विविध सामाजिक संस्था संघटना यांनी या समस्या बाबत अनेकदा संप, आंदोलने केली, शासकीय पत्रव्यवहार केला तरीही परिस्थिती सुधारत नसल्याने या मार्गावर अवैध वाहतूक, बेकायदेशीर पार्किंगला प्रोत्साहन मिळत आहे. या समस्यावर वेळीच उपाययोजना होणे गरजेचे आहे.

# ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले अनंतात विलिन

**दै.रायगड नगरी । पुणे**



ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचं आज निधन झालं. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात मागील चार दिवसांपासून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. विक्रम गोखलेंच्या निधनामुळे अभिनयाचं एक पर्व हरवल्याची भावना व्यक्त केली जात आहे. ७७ व्या वर्षीदेखील त्यांनी अभिनयाचा ध्यास सोडला नव्हता. संध्याकाळी सात वाजता पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, अभिनेते किशोर कदम, अभिनेता सुबोध भावे यांच्यासह अनेक जण विक्रम गोखले यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते. विक्रम गोखले अभिनयाचं विद्यापीठ होते. मागील अनेक वर्षांपासून त्यांनी मराठीच नाही तर बॉलीवूडमध्येही महत्वाच्या भूमिका निभावल्या होत्या. नवोदित कलकारांसाठी ते एक विद्या-पीठ होतं. प्रकृती खालावल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. काल त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती देखील त्यांच्या कुटुंबीयांनी दिली. मात्र, आज दुपारी त्यांचे निधन झाले.

विक्रम गोखले यांच्यासारख्या हरहुन्नरी कलाकाराच्या निधनाने सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अभिनय क्षेत्रातील अनेकांनी आपल्या आठवणी सोशल मीडियावर शेअर करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. तर नाना पाटेकर, शरद पोंक्षे यांनी देखील ट्विट करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांच्या जाण्याने मराठी चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

'नट जातो मात्र भूमिका कायम राहते' त्यांचा हा नटसम्राटमधील डायलॉग आज खरा ठरला आहे. त्यांच्या अनेक भूमिकांनी आपल्याला हसवलं, समजवलं, शिस्त दाखवली तर कधी रडवलं. मात्र सगळ्या भूमिकेत त्यांची वेगळी छाप होती.

प्रत्येक भूमिकेत ते आपली छाप सोडत असत. आज त्यांनी जगाचा निरोप घेतला. मात्र त्यांच्या बहूआयामी भूमिकेतून ते प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहतील.

# चित्राताई वाघ रविवारी खोपोलीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उत्तर रायगड जिल्हा भाजपच्यावतीने रविवार दिनांक २७ नोव्हेंबर रोजी खोपोलीत महिला मेळावा होणार असून या मेळाव्याला महिलांची



बुलंद तोफ असलेल्या भाजप महिला मोर्चाच्या नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

खोपोलीमधील लोहाणा समाज मंदिराच्या पटांगणात हा मेळावा सायंकाळी ०४ वाजता होणार असून यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तसेच पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, उरण नगरपरिषेदेच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा आश्विनी पाटील, खोपोली संपर्क प्रमुख सुनिल घरत, विधानसभा .../२

# शरद पवार यांच्या ८२ व्या जन्मदिनाच्या निमित्ताने कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन

## भव्य महारांगोळी ठरणार रायगड विभागाचे विशेष आकर्षण




**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय खासदार शरदचंद्र पवार साहेब यांचा १२ डिसेंबर रोजी ८२ वा जन्मदिवस साजरा करण्यात येणार आहे. दुग्ध शर्करा योग म्हणजे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सभासदत्व शरद पवार यांना प्राप्त झाल्याला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष फोफावण्यामध्ये पवार साहेबांचे अनन्यसाधारण योगदान आहे. म्हणूनच रयत शिक्षण संस्थेच्या पाचही विभागांच्या वतीने पवार यांच्या जन्मदिनाच्या औचीत्याने कृतज्ञता सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव गणेश ठाकूर यांनी दिली.ते कामोठे येथील रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित पत्रकार परिषदेस संबोधित करत होते. यावेळी रायगड विभागीय चेअरमन आमदार बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मेंबर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य जे एम म्हात्रे,दिलीप पाटील आदी मान्यवरांनी प्रसिद्धी माध्यमांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधला.

कृतज्ञता सप्ताहाचे विशेष आकर्षण म्हणजे पवार साहेबांच्या विविध भाव मुद्रा दर्शविणारी भव्य महारांगोळी असणार आहे.तब्बल ४० हजार स्क्वेअर फूट आकारमान असणाऱ्या या कलाकृतीकरता सहा हजार किलो वॉटरप्रूफ रांगोळी मागविण्यात आली आहे.कामोठे येथील माजी आमदार दत्तूशेठ पाटील विद्यालयाच्या प्रांगणामध्ये मंगेश खुटारकर, .../२

# साईनगर- कर्नाळा स्पोर्ट्स जोडणाऱ्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साई नगर येथून कळंबोलीला कर्नाळा स्पोर्ट्स मार्गे जाण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या अंतर्गत कच्चा रस्ता आहे. सदरचा रस्त्याच्या शेजारी अपटाऊन अवेन्यू ,सुशील ब्लॉसम, दुर्वांकुर, सुशील रुक्मिणी इमारती आहेत सदर इमारतीत एकंदरीत हजार ते बाराशे लोकवस्ती आहे. तसेच सदरचा रस्ता साईनगर वासियांना पनवेलच्या बाहेर जाण्यासाठी सोयीचा असल्याने या रस्त्यावर सतत रहदारी असते.

पावसाळ्यामध्ये सदर रस्त्याचे दुरुस्तीचे काम प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक नगरसेविका सौ.सारिकाताई भगत यांनी रहिवाशीयांना करून दिले होते. त्यानंतर सदर रस्ता हा डांबरीकरण करावा या रहिवाशांनी केलेल्या मागणीला त्वरित प्रतिसाद देत विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी संबंधित विभाग .../२



# सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळवून देणार : महेंद्र घरत



**दै.रायगड नगरी । उरण**

रोजगार युवा मंच उरण यांच्या माध्यमातून रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली २८ जुलै २०२२ रोजी रत्नेश्वरी सभागृह जसखार(उरण )येथे उरण मधील बेरोजगार तरुण-तरुणीसाठी भव्य रोजगार मेळावा आयोजित केला होता.

या मेळाव्याप्रसंगी जवळजवळ २०० ते २५० बेरोजगार तरुण - तरुणी यांनी सहभाग घेतला व आपले बायोडेटा जमा केले होते.त्यानंतर रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, कामगार नेते महेंद्र शेठ घरत व त्यांचे रोजगार मंचचे पदाधिकारी यांनी पाठपुरावा करून त्या मेळाव्यातील जमा झालेल्या बायोडाटा पैकी आजपर्यंत २७ बेरोजगारांना विविध कंपनीमध्ये नोकरी दिली आहे. तसेच जेएनपीए (जेएनपीटी ) पोर्ट मधे नव्याने आलेल्या जे. एम. बक्षी ग्रुपला मेळाव्यातील जमा झालेले सर्व अर्ज सुपूर्द केल्यानंतर दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ रोजी बेरोजगारांना ई-मेलच्या माध्यमातून मुलाखतीसाठी .../२




## संविधान दिनानामित्त महापालिकेत विविध कार्यक्रम

# महापालिका शाळांमध्ये 'संविधान दिन' उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज (२६ नोव्हेंबर) 'संविधान दिनानिमित्त' भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

या कार्यक्रमास आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड,सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, परवाना विभाग प्रमुख जयराम पादिर , भांडार विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, पालिका कर्मचारी उपस्थित होते.

तसेच पनवेल महापालिकेच्या ११ शाळांमध्ये 'संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिनानिमित्त सर्व शाळांमध्ये विदयार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्ये स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

पालिका शाळा क्र.७, तक्का मराठी शाळेला शिक्षण विभागाचे प्रमुख बाबासाहेब चिमणे यांनी भेट दिली. त्यांनी या .../२

# लढा समानतेचा

भारतीय सैन्यदलांची कवाडे महिलांना खुली असली, तरी पूर्वापारचा कोता दृष्टिकोन अजूनही स्त्री-पुरुष यांना मिळू शकणाऱ्या समान संधींच्या आड येतो. महिलांच्या संधींसंदर्भात सुरू असलेल्या खटल्यामध्ये भारतीय लष्कराने सर्वोच्च न्यायालयाची पुन्हा एकदा नाराजी ओढवून घेतली, त्यात ही गोष्ट अधोरेखित झाली. लष्करात कर्नल या पदावरील बढतीकरिता पात्र होण्यासाठी महिलांना निवड प्रक्रियेत डावलले गेल्याची तक्रार ३४ महिला अधिकाऱ्यांनी केली आहे. त्यांना शिक्षणासाठीची रजा व प्रतिनियुक्तीच्या संधींनाही पारखे व्हावे लागल्याचे या महिला अधिकाऱ्यांच्या वकिलांनी निदर्शनास आणून दिले. वर्षभरापूर्वीच न्या. चंद्रचूड यांच्यापुढेच महिलांना कायमस्वरूपी कमिशन देण्यात होत असलेल्या अन्यायाचे प्रकरण सुनावणीस आले होते. लेफ्टनन्ट कर्नल पदावरील महिलांसाठी पुरुष उमेदवारांप्रमाणेच विशेष नियुक्ती मंडळाची नियुक्ती करून वरच्या हुद्द्यावरील बढतीची संधी देण्यात येईल, असे आश्वासन लष्कराने त्यावेळी दिले होते. त्यानंतरही या महिलांना पद्धतशीर, अप्रत्यक्षपणे व लिंगभेदाधारित असमानतेला सामोरे जावे लागत आहे, अशी व्यथा त्यांच्या वकिलांनी मांडली आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. कर्नलपदाच्या स्पर्धेत महिलांना योग्य ती संधी न मिळाल्यामुळे सेवाज्येष्ठतेनुसार कनिष्ठ असलेले उमेदवार वरिष्ठ ठरले. प्रत्येक बाबतीत पात्र होण्यासाठी महिला अधिकाऱ्यांना न्यायालयाची पायरी चढावी लागणे, हे उचित नाही. झांशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या पराक्रमाचा आदर्श बाळगणाऱ्या भारतीय महिलांनी पहिल्या महायुद्धातही ब्रिटिश लष्करात वैद्यकीय सेवा बजावली होती. भारतीय सैन्यदलांमध्येही वैद्यकीय शाखेत महिला रुजू होत्या. १९९० च्या दशकांत महिलांना कमी मुदतीच्या सेवेसाठी (शॉर्ट सर्व्हिस कमिशन) नियमित अधिकारी श्रेणीत संधी मिळू लागली. सात ते १४ वर्षांपर्यंतच्या शॉर्ट सर्व्हिस कमिशनपासून पूर्णस्वरूपी कमिशनिंगला पात्र होण्यासाठी पुन्हा महिलांना न्यायालयात लढा द्यावा लागला. सर्वच क्षेत्रांत व विशेषकरून पुरुषी वर्चस्व असलेल्या अनेक क्षेत्रांत महिलांनी बाजी मारली असल्याने सैन्यदलांनाही महिलांसाठी हे क्षेत्र खुले करावे लागले. गेल्या दोन ते अडीच दशकांत यात लक्षणीय बदल झाला आहे व महिलांनी संधीचे सोने केले आहे. कारगिल युद्धात वैमानिक गुंजन सक्सेना यांची कामगिरी मोलाची ठरली. २०१५ मध्ये हवाई दलाने प्रथम तीन महिला लढाऊ वैमानिक म्हणून नेमल्या आणि प्रथमच लढाईचे क्षेत्र महिलांसाठी खुले झाले. त्यापाठोपाठ नौदलातही गस्तीविमानांवर तसेच युद्धनौकांवर तैनात हेलिकॉप्टरवर महिलांची नियुक्ती झाली. आज युद्धनौकांवर २८ महिला अधिकारी आहेत. नौदलातील सहा महिलांच्या चमूने विश्वसागरपरिक्रमाही पूर्ण केली. लष्करात २०२० पासून दरवर्षी शंभर या गतीने एक हजार ७०० लष्करी पोलिस नियुक्तीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले व त्याद्वारे जवान श्रेणीत प्रथमच महिलांचा प्रवेश झाला. या सर्व अभिमानास्पद घडामोडी घडत असतानाच, नित्याच्या निवड प्रक्रियेत मात्र हा दृष्टिकोन पुरेसा झिरपला आहे का, असा प्रश्न उभा राहतो. दरवेळी लढाईवर जाण्यास पात्र होण्याकरिता आधी न्यायालयात लढाई लढावी लागावी, असे होऊ नये. आजवर सैन्यदलांत प्रथम हे बिरूद मिळविलेल्या सर्व महिलांनी त्यांचे घर, गाव या प्रत्येक पातळीवर मोठा संघर्ष करत हे पद गाठलेले असते. कित्येकींना घरातून चांगले पाठबळ होते, परंतु समाजातील संघर्ष कमी नव्हता. स्त्री-पुरुष असा भेद बाजूला ठेवूनही बोलायचे, तर सैन्यदलातील प्रत्येक अधिकारी-जवान हे आपापल्या पातळीवर मोठा संघर्ष करूनच या सेवेत येतात. घरापासून दूर त्यांचा नित्याचा संघर्ष सुरू असतो. बहुतांश अधिकारीही छोट्यामोठ्या गावांतून व सामान्य परिस्थितीतून आलेले असतात. अधिकारीपदाची कवचकुंडले अंगी आल्यानंतर त्यांनी या परिस्थितीकडे व सामाजिक स्थित्यंतराकडेही खुलेपणाने पहायला हवे. कॉर्पोरेट जगतात किंवा सरकारी नोकरीतही आता स्त्रियांकडे कुटुंबातील दुय्यम कमावती व्यक्ती या नजरेने पाहता येणार नाही. त्याचप्रमाणे सैन्यदलांमध्येही अपेक्षित निकषांची कसोटी लावूनच परंतु निकोप मनाने स्त्रियांना संधी मिळायला हवी. भारतात एकीकडे स्त्रियांच्या हक्कांची चर्चा होत असतानाच, तिकडे फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत कतारच्या खलिफा स्टेडिअममध्ये इराणच्या संघाने दाखविलेले धार्ष्ट्य कौतुकास्पद आहे. हिजाबच्या हिंसक सक्तीच्या निषेधार्थ इराणच्या संघाने देशाच्या राष्ट्रगीताच्या वेळी मौन पाळले. एकीकडे सैन्यातील विषमतेच्या विरोधात लोकशाहीत न्यायालयात दाद मागण्याचा आधार महिलांना आहे, तर दुसरीकडे एका देशांत स्त्रियांविरोधात सक्तीची हिंसक भाषा जोर धरत असताना, त्याविरोधात पुरुष खेळाडू उभे ठाकत आहेत. हे चित्रही आशावादीच म्हटले पाहिजे.

# कोकण भवन येथे संविधान दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**



संविधान जागरूकता मोहीमेअंतर्गत आज २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त कोकण भावनातील पहिल्या मजल्यावरील समिती सभागृहात शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत समाज कल्याण मुंबई विभागाच्या प्रादेशिक उपयुक्त वंदना कोचुरे यांनी प्रास्ताविकेचे वाचन करून संविधान दिन साजरा केला.

यावेळी सहाय्यक आयुक्त (प्रशासन) मनीषा देवगुणे, प्रभारी तहसीलदार (सामान्य प्रशासन) माधुरी डोंगरे, सहाय्यक संचालक अन्न व नागरी पुरवठा, मंत्रालय श्री. सोनवणे, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक धर्मराज गोसावी, जनसंपर्क अधिकारी संजय भोसले, विनोद जामनेर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान प्रस्ताविकेच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रादेशिक उपयुक्त वंदना कोचुरे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांसह प्रस्ताविकेचे वाचन केले.

संविधानाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने २६ नोव्हेंबर रोजी जागरूकता मोहीम राबविण्यात येते. या मोहिमेअंतर्गत २६ नोव्हेंबर दिनी प्रत्येक शासकीय कार्यालयात प्रास्ताविकेचे वाचन केले जाते. तसेच या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सामाजिक न्याय विभागामार्फत संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर ते ,६ डिसेंबर २२ या कालावधीत समता पर्व हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने मुंबई विभागात मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यात सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या अधिनस्त शासकीय वस्तीगृह, निवासी शाळा, महाविद्यालय येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे या अनुषंगाने प्रभात फेरी, संविधान वाचन, व्याख्याने, जाती प्रमाणपत्र पडताळणी शिबिर, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी इत्यादीसाठी विविध कार्यक्रम, निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती समाज कल्याण विभाग मुंबईच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

# मुंबई - गोवा महामार्गाचे खड्डे टाळण्यासाठी रेल्वेने प्रवास

**दै.रायगड नगरी । रोहा**

जागोजागी पडलेले भयंकर आणि जीवघेणे खड्डे यामुळे धोकादायक झालेला मुंबई-गोवा महामार्गावरील प्रवास टाळण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे कोकणकन्या एक्सप्रेसने रत्नागिरीकडे निघाले, परंतु ओव्हरहेड वायरमध्ये झालेल्या बिघाडामुळे बावनकुळे वीर स्थानकावर पाच तास कोकण रेल्वेतच ताटकळले.

मुंबई - गोवा महामार्गाची प्रचंड दुर्दशा झाली आहे. गेल्या दहा वर्षांपासून कोकणवासीयांचा या भयंकर खड्डेमय रस्त्यातून प्रवास सुरू आहे. त्यात अपघातामुळे असंख्य बळी गेले आहेत, परंतु राज्यकर्ते कोकणवासीयांच्या या समस्येबाबत प्रचंड उदासीन आहेत.

या महामार्गावरचे खड्डे चुकविण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांनी रस्तेमार्गाचा प्रवास टाळून कोकण रेल्वेने रत्नागिरी गाठण्याचे ठरवले, परंतु ओव्हरहेड वायरमध्ये बिघाड झाल्याने गुरुवारी मध्यरात्री साडेतीन वाजण्याच्या सुमारास मुंबईकडून गोव्याकडे जाणारी जनशताब्दी एक्सप्रेस वीर रेल्वे स्थानकात थांबवण्यात आली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## चित्राताई वाघ रविवारी खोपोलीत

संयोजक दीपक बेहेरे, महिला मोर्चाच्या जिल्हा प्रभारी चारुशीला घरत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महिलांवरील अन्यायाला वाचा फोडण्याबरोबरच महिलांचे सक्षमीकरण करण्याचे काम चित्राताई वाघ सातत्याने करीत आहेत. त्यांच्या मौलिक मार्गदर्शनातून महिलांना मोठ्या प्रमाणात बळ मिळत असते, त्या अनुषंगाने हा मेळावा महिलांसाठी मार्गदर्शक असणार आहे.

## साईनगर- कर्नाळा स्पोर्ट्स जोडणाऱ्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू

अधिकाऱ्यांकडून सदर रस्त्याची पाहणी करून नागरिकांना होणारी गैरसोय लवकरात लवकर दूर करावी अशी सूचना केली होती. प्रितमदादा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे पनवेल महानगरपालिके मध्ये सौ.सारिकाताई भगत यांनी पाठपुरावा केला. पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. त्या ठिकाणी सुरू असलेल्या कामाची स्वतः जातीने उपस्थित राहून प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक नगरसेविका सौ सारिका ताई भगत , नगरसेविका डॉ.सौ.सुरेखा मोहोकर आणि शेकाप पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली. रस्ता डांबरीकरणाचे काम सुरू केले त्यामुळे तेथील रहिवासी यांनी विरोधी पक्षनेते श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे आभार मानले.

## शरद पवार यांच्या ८२ व्या जन्मदिनाच्या निमित्ताने कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन

रमेश खुटारकर आणि चेतन भोईर हे सुप्रसिद्ध रंगावली कलाकार ही कलाकृती साकारणार आहेत. कृतज्ञता सप्ताह मध्ये दिनांक ६ ते ८ डिसेंबर दरम्यान नावडे येथील प. जो. म्हात्रे विद्यालय यामध्ये क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सांघिक आणि वैयक्तिक अशा दोन मुख्य गटांच्यात या क्रीडा स्पर्धा पार पडतील. ७ डिसेंबर रोजी गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी पारगाव दापोली येथील अनंत पांडुरंग भोईर विद्यालयात निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ८ डिसेंबर रोजी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज कामोठे येथे भव्य विज्ञान प्रदर्शन संपन्न होणार आहे.९ डिसेंबर रोजी कामोठे न्यू इंग्लिश स्कूल येथे तज्ञ मंडळींचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी न्यू इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे येथे सांस्कृतिक कार्यक्रमांच्या स्पर्धांचे नियोजन करण्यात आलेले आहे. ९ डिसेंबर रोजी भव्य महारांगोळी पाहण्याची पर्वणी नागरिकांना मिळणार आहे. पनवेलच्या महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नऊ ते दहा डिसेंबर दरम्यान वक्तृत्व स्पर्धा,महाविद्यालयीन गटा करता निबंध स्पर्धा आणि आंतर महाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धांचे नियोजन करण्यात आले आहे. ११ डिसेंबर रोजी वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,फुंडे येथे अर्ध मॅरेथॉन पार पडणार आहे. यामध्ये रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनव्यतिरिक्त खुल्या गटातील स्पर्धक देखील भाग घेऊ शकतात. पवार साहेबांच्या जन्मदिनाच्या दिवशी अर्थातच १२ डिसेंबर रोजी रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील विविध शाखांच्या मुख्यालयात वृक्षारोपण,आरोग्य शिबिरे आणि स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.१७ डिसेंबर रोजी वाशीच्या विष्णुदास भावे नाट्यगृहात विभागीय स्पर्धांचे पारितोषिक वितरण संपन्न होणार आहे. यावेळी रघुनाथ माशेलकर,अनिल काकोडकर अशा दिग्गजांचे विचार ऐकण्याची पर्वणी उपस्थितांना मिळणार आहे. १५ ऑक्टोबर रोजी संपन्न झालेल्या रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीमध्ये शरद पवार साहेबांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने कृतज्ञता सप्ताह साजरा करण्याचे एकमताने ठरले होते. रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागांतर्गत रायगड जिल्हा, ठाणे जिल्हा, मुंबई व पालघर जिल्हा या ठिकाणच्या शाळा समाविष्ट होतात. रायगड विभागाचे पोलादपूर गट, उरण गट, पनवेल गट, मुंबई गट आणि मोखाडा /डोळखांब गट असे वर्गीकरण करण्यात येते. येथील सर्व शाळांतील विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभाग घेणार आहेत. पवार साहेब म्हणजे हिमालयाच्या उंचीच्या व्यक्तिमत्वाचे विचार,त्यांचे कार्य, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे अनन्यसाधारण योगदान, प्रगतीवादी विचारांची कास धरत साधलेले विकास पर्व! हे सारे घडणाऱ्या पिढ्यांना कळावे या उद्देशाने कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व स्पर्धांकरता आकर्षक स्वरूपाची रोख पारितोषिके आणि सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत. भव्य दिव्य रकमांच्या या स्पर्धांच्या नियोजना करता मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २५ लाख रुपयांची देणगी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे.

## सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळवून देणार : महेंद्र घरत

कॉल आले होते. या सर्व उमेदवारांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच ज्यांना नोकरी लागली आहे त्यांचे अभिनंदन करण्यासाठी शुक्रवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी आनंदी हॉटेल उरण येथे रोजगार आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी प्रमुख मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या शुभहस्ते नोकरी मिळालेल्या तरुण तरुनींचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी रोजगार युवा मंच उरणचे पदाधिकारी, किरीट पाटील, डॉ. मनिष पाटील, प्रकाश पाटील, रोहित घरत, कमलाकर घरत, जयवंत पाटील, संजय ठाकूर, के. डी कोळी, नंदा कोळी, सदानंद पाटील, निर्मला पाटील, लंकेश ठाकूर, हेमंत ठाकूर, चेतन पाटील, भालचंद्र नाखवा, प्रांजल भोईर, अजित ठाकूर, योगानंद म्हात्रे, विवेक म्हात्रे, आनंद ठाकूर, राजेंद्र भगत, आदित्य घरत, योगेश रसाळ, आदी उपस्थित होते. तसेच बेरोजगार तरुण-तरुणी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, उरण मधील बेरोजगार तरुण-तरुणी यांच्यासाठी मी व युवा रोजगार मंच प्रामाणिक पणे काम करून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्याचा काम करणार आहोत. जास्तीत जास्त बेरोजगारांना नोकरी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असेल असे महेंद्रशेठ घरत यांनी सांगितले.उपस्थित बेरोजगार उमेदवार तसेच पालक वर्गांनी महेंद्रशेठ घरत व रोजगार युवा मंचचे सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत.

## महापालिका शाळांमध्ये 'संविधान दिन' उत्साहात साजरा

दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच संविधानाच्या प्रतीचे पूजन करून उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून घेण्यात आले.

यावेळी त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व, संविधान म्हणजे काय, संविधानाने आपल्याला दिलेले अधिकार, याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# पागोटे गावात ओपन जीम, हुतात्मा मैदानाच्या रंगमंचा लोकार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

पागोटे गावातील आबालवृद्ध तसेच खेळाडू यांच्या साठी उभारण्यात आलेल्या ओपन जीम व हुतात्मा मैदानाच्या रंगमंचा लोकार्पण सोहळा पागोटे ग्रामपंचायतीचे सरपंच समिर दयाराम पाटील यांच्या हस्ते नुकताच पार पडला.

पागोटे गावातील आबालवृद्ध तसेच खेळाडू,तरुण यांनी सातत्याने ग्रामपंचायतीकडे ओपन जीम व हुतात्मा मैदानाच्या रंगमंची मागणी केली होती.

या मागणीची दखल पागोटे ग्रामपंचायतीचे सरपंच समिर दयाराम पाटील यांनी घेऊन नुकताच जेष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत ओपन जीम व हुतात्मा मैदानाच्या रंगमंचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी पागोटे गावातील जेष्ठ नागरिक तसेच माजी सरपंच अँड भार्गव पाटील,माजी सरपंच मिलिंद तांडेल सह आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.


दिनांक : २६/११/२०२२

### जाहीर सूचना

मे.सिमरन इंटरप्राजेस वतीने भागीदार श्री.आकाश अग्रवाल, पत्ता : १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं-९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सुचना देत आहेत.

आमचे नावे, ताबे-कब्जातील मौजे आकुर्ली, ता. पनवेल, जि.रायगड येथे महसुल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ९/अ व १० | ३०६० चौ.मी. |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ व्दारे परवानगी दिलेली आहे आणि सदर सक्षम नगर रचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ व्दारे कमेंन्समेंट सर्टिफिकेट माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक/विकासकाचे नांव आणि पत्ता | मे.सिमरन इंटरप्रायजेस वतीने भागीदार श्री आकाश अग्रवाल, १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं-९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता मिळकतीचे वर्णन | कॉन्ट्रक्स, १३०२, हायटेक सीएचएस, प्लॉट नं -११, सेक्टर-३८, सीवुडस्, नवी मुंबई. |
| विकसनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्र. आणि दिनांक | सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ |
| कमेंन्समेंट सर्टीफिकेटचे आदेश क्र. आणि दि. | सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ |
| मंजूर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय.) | मंजूर एफ.एस.आय.१ (एक) |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजूर क्षेत्र | एकुण ८४ सदनिका ज्या दोन तळमजला अधिक ४ मजल्याच्या इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र ३०५६.४१ चौ.मी. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रति संबंधित कागदपत्रांच्या प्रति तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | मे.सिमरन इंटरप्रायजेस वतीने गट नं.९/अ व १०, मौजे आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड |
| आर्किटेक्टचे नाव | ए.एन. आर्च, आर्किटेक्ट-नेहा जैन |
| स्ट्रक्चरल इंजिनिअरचे नाव | आधारशिला कन्सलटंन्ट-समर्थ अग्रवाल |


# म्हसळा पोलीस ठाणेसंबंधित असणाऱ्या समस्या निश्चितपणे सोडविणार : अतुल झेंडे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी नुकतीच प्रशासकीय कामानिमित्त म्हसळा पोलीस ठाण्याला भेट दिली. या भेटीदरम्यान अतुल झेंडे यांनी तालुका पत्रकार संघ, विविध संघटना, पोलीस पाटिल संघटना यांच्याची चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.म्हसळा तालुका पत्रकार संघ कमिटी बरोबर सविस्तर चर्चा करताना शहरातील सर्वांना भेडसावणारा ट्रॅफिक जाम च्या समस्येबाबत यावर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.१९७४ पासून मंजूर असलेला कर्मचारी स्टाफ बाबत बोलताना अतुल झेंडे यांनी सांगितले कि बऱ्याच कालावधीपासून पोलीस खात्यात नवीन भरती न झाल्याने या समस्या संपूर्ण जिल्ह्याला भडसावत असून नजीकच्या काळात नवीन भरतीतून हि समस्या सोडविण्याचा निश्चित प्रयत्न करण्याचेही आश्वासन त्यांनी याप्रसंगी केले. अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने नागरिकांच्या समस्या सोडविणे हिच खरी अधिकाऱ्यांची तारेवरची कसरत असल्याचे सांगितले. वारंवार घोणशे घाटात होणारे छोटे -मोठे अपघात हा महत्वाचा प्रश्न असून खास. सुनिल तटकरे यांच्या प्रयत्नातून त्याबाबत काम प्रगती पाठवर असून संबंधित खात्याकडे या बाबत पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे अतुल झेंडे यांनी सांगिते.


### श्री ओंकार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्र.केबीओ/एचएसजी/३२३/दि.०१/०३/१९७९
फायनल प्लॉट क्रमांक ५०/५, परदेशी आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

श्री ओंकार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, फायनल प्लॉट क्रमांक ५०/५, परदेशी आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या संस्थेने इमारतीच्या पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची प्रत संस्थेचे चेअरमन / सेक्रेटरी यांचेकडे दिनांक २८/११/२०२२ ते दिनांक ०१/१२/२०२२ या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांना पाहणी करता येईल व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक ०१/१२/२०२२ ते दिनांक ०४/१२/२०२२ या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन / सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा ह्या कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदांना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

**सही/-**
**चेअरमन/सेक्रेटरी**
**श्री.ओंकार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**फायनल प्लॉट क्रमांक ५०/५, परदेशी आळी,**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९३२५००४००८ (सेक्रेटरी)**

### HARI KUNJ CO-OP. HOUSING SOCIETY LTD.

Regd No.N.B.O.M/CIDCO/HSG/(OH)/1037/JTR/2000-2001

**जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, हरी कुंज को.ऑ.हौ. सोसायटी लि. प्लॉट नं.२३७/२४४, सेक्टर-१०, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ या संस्थेचे सभासद श्री.बाबासाहेब एस. पाटील व सौ.प्रमिला बी. पाटील यांनी संस्थेमधील फ्लॅट नं.३०२, हा त्यांच्या मालकीचा आहे. या संस्थेचे नोंदणी नंतर त्यांचे नावे शेअर सर्टीफिकेट क्र.०१, अनुक्रमांक १ ते ५ असे असून गाडीवरुन प्रवास करतेवेळी सदर सर्टीफिकेट गहाळ झाले आहे. श्री.बाबासाहेब एस.पाटील व सौ.प्रमिला बी. पाटील यांनी सोसायटीकडून दुय्यम प्रत मिळणेसाठी अर्ज केलेला अहे. त्यांच्या मागणीनुसार संस्थेने श्री.बाबासाहेब एस. पाटील व सौ.प्रमिला बी. पाटील यांना दुय्यम प्रत सर्टीफिकेट देण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच त्यांना सुपूर्द केलेले जुने शेअर सर्टीफिकेट अन्य कोणास तारण / गहाण, बक्षिस अथवा खरेदी / विक्री इत्यादी प्रकारे देण्यात आलेले असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क प्रस्तापित होत असल्यास संस्थेच्या खालील पत्यावर सचिव यांचे नावे त्यांना पोहोच होईल अशा कोणत्याही मार्गाने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करणे. या मुदतीत कोणाकडून ही हरकती प्राप्त न झाल्यास डुप्लिकेट शेअर सर्टीफिकेट दिले जाईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर होणाऱ्या परिणामांची संस्थेवर जबाबदारी राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/११/२०२२

**सही/-**
**चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार**
**हरी कुंज को.ऑप.हौ.सोसायटी लि.**
**प्लॉट नं.२३७/२४४, सेक्टर-१०,**
**नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

### HARI KUNJ CO-OP. HOUSING SOCIETY LTD.

Regd No.N.B.O.M/CIDCO/HSG/(OH)/1037/JTR/2000-2001

**जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, हरी कुंज को.ऑ.हौ. सोसायटी लि. प्लॉट नं.२३७/२४४, सेक्टर-१०, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६. या संस्थेचे सभासद श्री.योगेश टिकम लबडे यांनी संस्थेमधील फ्लॅट नं.२०४, हा त्यांच्या मालकीचा आहे. या संस्थेचे नोंदणी नंतर त्यांचे नावे शेअर सर्टीफिकेट क्र.१०, अनुक्रमांक ४६ ते ५० असे असून गाडीवरुन प्रवास करतेवेळी सदर सर्टीफिकेट गहाळ झाले आहे. श्री.योगेश टिकम लबडे यांनी सोसायटीकडून दुय्यम प्रति मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. त्यांच्या मागणी नुसार संस्थेने श्री.योगेश टिकम लबडे यांना दुय्यम प्रत सर्टीफिकेट देण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच त्यांना सुपूर्द केलेले जुने शेअर सर्टीफिकेट अन्य कोणास तारण / गहाण, बक्षिस अथवा खरेदी / विक्री इत्यादी प्रकारे देण्यात आलेले असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क प्रस्तापित होत असल्यास संस्थेच्या खालील पत्यावर सचिव यांचे नावे त्यांना पोहोच होईल अशा कोणत्याही मार्गाने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करणे. या मुदतीत कोणाकडून ही हरकती प्राप्त न झाल्यास डुप्लिकेट शेअर सर्टीफिकेट दिले जाईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर होणाऱ्या परिणामांची संस्थेवर जबाबदारी राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/११/२०२२

**सही/-**
**चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार**
**हरी कुंज को.ऑप.हौ.सोसायटी लि.**
**प्लॉट नं.२३७/२४४, सेक्टर-१०,**
**नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# दिवसभर शेतीची कामे; रात्री उमेदवार संशोधन ऐन थंडीत रहाटाड ग्रामपंचायत निवडणूक वातावरण तापले

**दै.रायगड नगरी । तळा**

ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्या. यासाठी १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तसेच, २८ नोव्हेंबरपासून नामांकन प्रक्रिया सुरू होणार आहे. आदल्या दिवशी शेती आणि रात्रीचे राजकारण, असे गावचे चित्र तयार झाले आहे. त्या रात्रीच्या बैठका सुरू झाल्या आहेत. या बैठकीत सरपंच पदाच्या उमेदवारासह सदस्य पदाच्या उमेदवाराचा शोध सुरू आहे.तळा तालुक्यात रहाटाड या एकमेव ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. गुडघ्याला बाशिंग धारण असलेल्या इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच प्रचाराला सुरुवात केली आहे. निवडणुकीचे गावनिहाय स्वरूप असल्याने गावागावातील धार्मिक व सामाजिक कार्यक्रम हे प्रचाराचे माध्यम बनले आहेत.

सध्याच्या शेतीच्या हंगामात भात कापणी आणि मळणीची कामे सुरू असताना गावातील राजकारणी निवडणुकीच्या कामाला, शेतीच्या खऱ्या वाटेला प्राधान्य देऊ लागतात. गाव-ातील विविध राजकीय पक्षांचे नेते त्यांच्या कार्यकर्त्यांशी बोलतात आणि बैठका घेतात. बैठकीत सरपंचपदासाठी पात्र उमेदवार कोण आणि सदस्यपदासाठी कोण उभे राहणार, यावर विचारमंथन सुरू आहे. निवडणूक लढवणारी व्यक्ती किंवा इच्छुक व्यक्ती, त्यांची मंडळी सक्रिय झाली आहेत. गावातच निवडणुकीचे मोर्चेबांधणी सुरू आहे. रात्री आयोजित सभेत मंथन घडत आहे. सक्रिय राजकारणी तसेच नेत्यांना त्यांच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीची माहिती सार्वजनिक करण्यासाठी नवीन आणि उपयुक्त माहिती दिली जात आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तारीख जवळ आल्याने या सभांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

तालुक्यातील रहाटाड ग्रामपंचायत ही मोठी ग्रामपंचायत असून राजकीय दृष्टीने महत्त्वाची ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीमध्ये रहाटाड गाव, रहाटाड वाडी, धनगरवाडी, बौद्धवाडी, आदिवासी वाडी अशा गावांचा समावेश असून येथे कोळी समाज, कुणबी समाज,मुस्लिम समाज, गवळी समाज, मराठा समाज नाभिक समाज, बुरुड समाज, आगरी समाज, बौद्ध समाज, धनगर समाज, आदिवासी समाज आहेत. बहुसमाज असलेल्या या ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असून मागील थेट सरपंच पदासाठी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस कडून चांगदेव पाटील यांना ग्रामस्थांनी बिनविरोध निवडून दिले होते आणि ८ सदस्यांपैकी केवळ एका सदस्यासाठी निवडणूक लागली होती. यावेळी शिंदे गट आणि भाजप निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार नाही हे पक्के झाले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राबल्य असलेल्या या ग्रामपंचायतीत शिंदे गट आणि भाजप कोणती राजकीय गणिते आखतात यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून राहणार आहे.

# संक्षिप्त...

## अवैधपणे गॅससिलेंडरचा वापर करणाऱ्या फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अवैध्यपणे गॅससिलेंडरचा वापर करणाऱ्याविरुद्ध पोलिसांनी कारवाई चा बडगा उचलला आहे.

तळोजा परिसरात रस्त्यावर विनापरवाना गॅस सिलेंडर चा वापर करून चायनीज बनविणारा परमान खान तसेच त्याच परिसरात पाणीपुरी विक्री करणारा मोफीजुर मंडल या दोघांविरोधात रस्त्यावर रहदारीच्या ठिकाणी गॅस सिलेंडर चा अवैध्यपणे वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निसर्ग स्पंदन काव्य संग्रह पुस्तकाचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथे जेष्ठ नागरिक संघ हॉल, नवीन पनवेल से. २ येथे कवी डॉ. शंतनू रसे यांच्या हस्ते निसर्ग स्पंदन काव्य संग्रह पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी निलेश भोपतराव यांच्यासह दीप्ती वडेर, समृद्धी चौधरी, गार्गी खोत, विक्रम वाडकर, प्राची बामणे, ऐश्वर्या मपारा, जयेश पाटील, गिरीश भट, माला मेश्राम अनेक मान्यवर उपस्थित होते.

## मोटारसायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात उभी करून ठेवलेली मोटारसायकल चोरीस गेल्याने या बाबतची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. वर्की पुरामृताहू यांनी त्यांची मोटारसायकल पनवेल रेल्वे स्थानकाच्या पे अँड पार्क मध्ये उभीही करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटारसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भारतीय संविधान पुस्तकाचे पूजन करून उरण नगर परिषद वाचनालयात संविधान दिन साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

२६ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारतात भारतीय संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. या संविधान दिना निमित्त उरण मध्ये विविध संस्था, संघटना तर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उरण शहरात विमला तलावा शेजारी असलेल्या उरण नगर परिषदेच्या माँसाहेब मीनाताई ठाकरे सार्वजनिक ग्रंथालयमध्ये भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय राज्यघटना पुस्तकाचे पूजन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी उरण नगर परिषदेचे माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयचे कर्मचारी जयेश वत्सराज, अभिषेक कोळी, मेघना कोळी,इम्रान खान, देविना मुंबईकर, संजय म्हात्रे, दादाराम कळकुंबे, बळीराम कोळी, शुभम गौडदाब आदी वाचक वर्ग, स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी पुन्हा विनापरवाना खाद्यपदार्थांच्या हातगाड्या सुरू, शहरातील स्थानिक नागरिकांवर अन्याय

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

गेल्या अनेक दिवसांपासून श्रीवर्धन समुद्रकिनारी खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या अनधिकृत हातगाड्या लागत होत्या. या हातगाड्यांवरून विविध प्रकारचे खाद्यपदार्थ त्याचप्रमाणे जेवण देखील विक्री केले जात होते. काही हातगाडी चालकांकडून येणाऱ्या पर्यटकांना जेवण बनवून श्रीवर्धन समुद्रकिनारी असलेल्या सुशोभित बंधाऱ्यावरती जेवण वाढण्याचा प्रकार उघड झाला होता. त्यानंतर नगर परिषदेच्या एका महिला कर्मचाऱ्याने सदर सार्वजनिक ठिकाणी जेवण वाढणाऱ्या हातगाडीवाल्याला जाब विचारल्यानंतर त्यांच्यामध्ये वाद झाला.

सदर प्रकरणानंतर श्रीवर्धन पोलीस ठाण्यात हे प्रकरण गेले होते. पोलिसांनी या प्रकरणी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. तर सदरचे प्रकरण श्रीवर्धन नगर परिषदेकडे गेल्यानंतर श्रीवर्धन नगर परिषदेने सर्व अनधिकृत हातगाड्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरून उचलल्या होत्या. परंतु आज सकाळी अचानकपणे पुन्हा सर्व अनधिकृत खाद्यपदार्थ विक्री करणारे श्रीवर्धन समुद्रकिनारी खाद्यपदार्थांची विक्री करताना पाहायला मिळत आहेत.

यामध्ये खाद्यपदार्थ विक्री करणारे अनेक जण श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीच्या व्यतिरिक्त इतर ग्रामपंचायत हद्दीतील किंवा बाहेरच्या तालुक्यातील असल्याचे दिसून येते. याबाबत श्रीवर्धनच्या स्थानिक नागरिकांनी नगरपरिषदेला विनंती केली होती की, हातगाड्या लावण्यासाठी केवळ स्थानिक नागरिकांना परवानगी द्यावी. अन्यथा श्रीवर्धन येथील स्थानिक नागरिक नगर परिषदेने बाहेरच्या व्यक्तीना परवानगी दिल्यास मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे देखील वृत्त प्रसिद्ध झाले होते.

श्रीवर्धन समुद्रकिनारी हातगाड्या जरी नगर परिषदेच्या परवानगीने लागत असल्या तरी, सदर हातगाड्या लागण्याची जागा वना खात्याच्या मालकीची आहे. श्रीवर्धन शहराबाहेरच्या नागरिकांना श्रीवर्धन समुद्रकिनारी खाद्यपदार्थ विक्री करण्यास परवानगी दिल्यामुळे स्थानिक नागरिकांवरती अन्याय होत असल्याचे बोलले जात आहे.

तरी श्रीवर्धन नगरपरिषद व वनखात्याने पुनर्विचार करून श्रीवर्धन शहरातील नागरिकांनाच खाद्यपदार्थांच्या हात गाड्या लावण्यासाठी परवानगी द्यावी. बाहेरगावच्या लोकांना परवानगी देऊ नये. जेणेकरून स्थानिक नागरिकांचा रोजगार धोक्यात येईल. अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# सर्वच राजकीय पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आचार संहितेचे पालन करावे : सुनील पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतचे निवडणूक १८ डिसेंबर २०२२ रोजी होणार असून उरण तालुक्यातील वशेणी ग्रामपंचायतचे निवडणूक १८ डिसेंबर रोजी असल्याने गावातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची मीटिंग श्री हनुमान मंदिर, वशेणी येथे मीटिंग संपन्न झाली.

सदर मिटींगला उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील हे स्वतः हजर राहून कार्यकर्त्यांना आचारसंहितेविषयी मार्गदर्शन केले. सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, भावी उमेदवार मीटिंगसाठी उपस्थित होते. समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित कसे राहिल याकडे सर्वांनी लक्ष देणे गरजेचे असून आचार संहितेचे सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांनी यावेळी केले.

मे.सोनावणे सो. यांचे कोर्टात

अॅड.संतोष पाडळकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७२५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०१/२०२३

कै.गिरीश चिंतामण बोटेकर (मयत) वारस
कु.सानिका गिरीश बोटेकर
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी.१, माऊली दर्शन को.ऑ.हौ.सोसायटी,
महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसने तमाम जनतेस कळविण्यात येते की, कै. गिरीश चिंतामण बोटेकर यांचे दि.२६/०७/२०१३ रोजी त्यांचे राहते घरी बी-१, माऊली दर्शन को.ऑ.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांची आई कै.सुमती चिंतामण बोटेकर ह्यांचे दि.१९/११/२०१७ रोजी ए-५०२, साईराज पार्क को.ऑ.हौ. सोसायटी, राजाजी पथ डोंबिवली (पू.), जि.ठाणे येथील त्यांचे राहते घरी निधन झालेले आहे. सदर अर्जाचे कामी अर्जदार हिने कै.गिरीश चिंतामण बोटेकर व कै.सुमती चिंतामण बोटेकर यांच्या मृत्यूदाखल्याच्या मुळ प्रती दाखल केलेल्या आहेत. प्रस्तुत अर्जातील अर्जदार ही कै. गिरीश चिंतामण बोटेकर यांची एकुलती एक मुलगी आहे. कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांच्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**फ्लॅट मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

फ्लॅट नं.१, बि-विंग, तळमजला, क्षेत्र ५४५ चौ.फूट (बिल्टअप) म्हणजेच ५०.६३ चौ.मी. (बिल्टअप), माऊली दर्शन को.ऑ.हौसिंग, सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

वर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांनी दि.२८/१०/२००५ रोजी मे.दुय्यम निबंधक सो, पनवेल-३ यांचे कार्यालयाकडील नोंदणीकृत दस्त क्र.३८७६/२००५ अन्वये नोंदणीकृत डीड ऑफ ट्रान्सफर अॅण्ड सेल या दस्ताने उक्त रक्कम रु.४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पन्नास हजार मात्र) अदा करून खरेदी केलेली आहे. सदर दस्ताची व्हेरीफाईड प्रत प्रस्तुतचे अर्जाचे कामी अर्जदारांनी मे.कोर्टाकडे दाखल केलेली आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे वर्णन परिशिष्टामधील मिळकत कै. गिरीश चिंतामण बोटेकर यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांच्या निधना पश्चात त्यांच्या वारसांच्या नावे सदरहू मिळकत करण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून अर्जदार हेच कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांचे वारस असलेबाबत मे.कोर्टाकडील वारसदाखला आणणेकरिता तोंडी सांगण्यात आलेले आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मे.कोर्टाकडे केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.०२/०१/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्टाकडून अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांचे वारसनोंद दाखला देण्याकामी आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२५/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## शुद्धीपत्रक

तमाम जनतेस असे कळविण्यात येते की, ''दैनिक रायगड नगरी'' या वृत्तपत्रात वार-शनिवार, दिनांक २२/१०/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अॅड.संगम घरत या नोटीसीमध्ये नजरचुकीने प्रतिक्ष संजय पाटील व २९० असे छापण्यात आले होते. तरी ते प्रतिक्षा संजय पाटील व २७० असे वाचण्यात यावे.

मा.गुन्नाल साहेब कोर्ट

अॅड.शशिकांत काळु म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६२९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०१/२०२३

१) श्री.एकनाथ मणिराम खानावकर
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२) श्रीमती.आनंदी मणिराम खानावकर
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
३) कै.रामचंद्र मणिराम खानावकर यांचे वारस
३/१) श्रीमती.मालती रामचंद्र खानावकर
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
३/२) श्री.योगेंद्र रामचंद्र खानावकर
वय : ३० वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
३/३) प्रज्योती मिथुन भोईर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
३/४) प्रणाली मेघनाथ पालेकर
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वलवली, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
४) वनिता गणेश गायकर
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.भिंगारवाडी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे वडील अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.३/१ यांचे सासरे, अर्जदार क्र.३/२ ते ३/४ यांचे आजोबा व अर्जदार क्र.४ यांचे वडील कै.मणिराम महादू खानावकर हे दि.२७/०९/२०१२ रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.मणिराम महादू खानावकर यांच्या सामाईक मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १० बी | २२ | २ | ०-४९-५ |

वर नमूद मिळकतीत कै.मणिराम महादू खानावकर यांचे वारसदार या नात्याने अर्जदार क्र.१ ते ४ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.मणिराम महादू खानावकर यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.मणिराम महादू खानावकर यांचे अर्जदार नं.१ ते ४ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

प्रो.जमा रु.५०/- — अर्जदारातर्फे वकील
वारस दाखला — अॅड.कैलास ना. घरत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, पनवेल व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१७०१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२३

१) श्रीमती.कुंदा चंद्रकांत पाटील
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वरचे ओवळे, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.सुनिता मनोज नाईक
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१६२०, गावदेवी मंदिराच्या समोर,
सेक्टर-२३, जुईनगर, नवी मुंबई, सानपाडा, ठाणे
३) श्रीमती.कविता सतीश म्हात्रे
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
घर नं.४९२, उलवे गाव, वॉटर टँकच्या बाजूला,
पो.तरघर, रायगड
४) सौ.सुचिता राजेश भोईर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.७१, हनुमान मंदिर मार्ग,
राम मंदिर मागे, बेलापूर गाव, सेक्टर-२०,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ठाणे
५) सौ.वीणा धीरज पाटील
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१११, पनवेल उरण रोड,
एसबीआय एटीएम जवळ, ओवळे गाव,
पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.०१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील कै.चंद्रकांत लक्ष्मण उर्फ लक्ष्मन पाटील यांचा मृत्यू दि.०२/०६/२०१९ रोजी, अपोलो हॉस्पिटल, सेक्टर-२३, बेलापूर, नवी मुंबई, ठाणे येथे झालेला आहे. सबब कै.चंद्रकांत लक्ष्मण उर्फ लक्ष्मन पाटील यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ ते ५ हेच वारसदार आहेत.

कै.चंद्रकांत लक्ष्मण उर्फ लक्ष्मन पाटील हे हयात असताना त्यांच्या ताबेकब्जात आणि मालकी हक्कात असलेली खालील वर्णनाची जमिन / भूखंड मिळकत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | १ | २ | ०-१४-४ |
| २ | १४ | ५ ब | ०-१९-२ |
| ३ | ३० | १ (१) | ०-४२-५ |
| ४ | ५ | ४ | ०-१४-४ |
| ५ | ५६ | २४ | ०-१७-० |

वर वर्णन केलेली संपादीत मिळकत क्र.१ ते ५ चे अॅवार्ड क्र.ओवळे-४३ कै.चंद्रकांत लक्ष्मण उर्फ लक्ष्मन पाटील व सहहिस्सेदार यांचे सामुहिक नावे भूखंड जाहीर झालेले असून, त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भूखंडाचे वर्णन**
**नोड : पुष्पकनगर/दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| पुष्पकनगर/दापोली | ओवळे-४३ | १० | ०५ | १७०० चौ.मी. |

वरील मिळकती व मिळकतीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या भूखंडा संदर्भात व इतर फायदे या करिता अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२३/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.सोनावणे सो. यांचे कोर्टात

अॅड.संतोष पाडळकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७२४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०१/२०२३

कै.संतोष प्रभाकर तामसे (मयत) वारस
१) श्रीमती.समिधा संतोष तामसे
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.निता संतोष तामसे
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही रा.पी.एल.५-बी/१०, रुम नं.१६,
सेक्टर नं.१०, जीवन सागर को.ऑ.हौ.सोसायटी,
खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसने तमाम जनतेस कळविण्यात येते की, कै.संतोष प्रभाकर तामसे (मयत) वारस १) श्रीमती.समिधा संतोष तामसे, वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी २) कु.निता संतोष तामसे, वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी, दोघीही रा.पी.एल.५-बी/१०, रुम नं.१६, सेक्टर नं.१०, जीवन सागर को.ऑ.हौ.सोसायटी, खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टाकडे कै.संतोष प्रभाकर तामसे यांचे वारस ठरवून मिळणेकरिता अर्ज केलेला आहे. कै.संतोष प्रभाकर तामसे यांचे दि.१२/०१/२०२२ रोजी त्यांचे सर सुंदरलाल हॉस्पिटल, आय.एम.एस., भू-वाराणसी, उत्तर प्रदेश येथे निधन झालेले आहे. तसेच कै.संतोष प्रभाकर तामसे यांची आई कै.आशा प्रभाकर तामसे ह्यांचे दि.२५/१२/२००९ रोजी डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे निधन झालेले आहे. सदर अर्जाचे कामी अर्जदार ह्यांनी कै.संतोष प्रभाकर तामसे व कै.आशा प्रभाकर तामसे यांच्या मृत्यूदाखल्याच्या मुळ प्रती दाखल केलेल्या आहेत. प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ ह्या कै.संतोष प्रभाकर तामसे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ ही एकुलती-एक कन्या आहे. कै. संतोष प्रभाकर तामसे यांच्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**परिशिष्ट 'अ'**
**फ्लॅट मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड**

फ्लॅट नं.१६, तिसरा मजला, पी.एल-५ बी/१६, क्षेत्र ३०.५० चौ.मी., सेक्टर नं.१०, जीवन सागर को.ऑ.हौ.सोसायटी, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड

**परिशिष्ट 'ब'**
**घर मिळकतीचे वर्णन**
**मौजे : भाताण, ता.पनवेल, जि.रायगड**

घर क्र.९० अ, ९० ब व ९० क, क्षेत्र-३७४ चौ.फूट प्रत्येकी म्हणजेच एकूण क्षेत्र ११२२ चौ.फूट कारपेट एरिया

वर वर्णन केलेली परिशिष्ट 'अ' मधील फ्लॅट मिळकत कै.संतोष प्रभाकर तामसे यांनी दि.२२/०७/१९९३ रोजी मे.दुय्यम निबंधक सो., पनवेल यांचे कार्यालयातील नोंदणीकृत दस्त क्र.१५४५/१९९३ अन्वये नोंदणीकृत डीड ऑफ अपार्टमेंट या दस्ताने उक्त रक्कम रु.१,२२,१००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख बावीस हजार शंभर मात्र) अद करून खरेदी केलेली आहे. सदर दस्ताची व्हेरीफाईड प्रत प्रस्तुतचे अर्जाचे कामी अर्जदारांनी मे.कोर्टाकडे दाखल केलेली आहे.

वर वर्णन केलेली परिशिष्ट 'ब' मधील घर मिळकत कै.संतोष प्रभाकर तामसे यांनी दि.३०/०३/२०१८ रोजी मे.दुय्यम निबंधक सो., पनवेल-५ यांचे कार्यालयाकडील नोंदणीकृत दस्त क्र.३६२२/२०१८ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत या दस्ताने उक्त रक्कम रु.४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पन्नास हजार मात्र) अदा करून खरेदी केलेली आहे. सदर दस्ताची व्हेरीफाईड प्रत प्रस्तुतचे अर्जाचे कामी अर्जदारांनी मे.कोर्टाकडे दाखल केलेली आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे वर्णन परिशिष्टामधील मिळकत कै. संतोष प्रभाकर तामसे यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. कै.संतोष प्रभाकर तामसे यांच्या निधना पश्चात अर्जदार यांचे नावे सदरहू मिळकत करण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून, सिडको कार्यालयाकडून तसेच भाताण ग्रामपंचायतीकडून अर्जदार हेच कै.संतोष प्रभाकर तामसे यांचे वारस असलेबाबत मे.कोर्टाकडील वारसदाखला आणणेकरिता तोंडी सांगण्यात आलेले आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मे.कोर्टाकडे केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.०२/०१/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्टाकडून अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कै.संतोष प्रभाकर तामसे यांचे वारसनोंद दाखला देण्याकामी आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२५/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका परिसरात अवैध्यरित्या विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे.

तालुक्यातील बारापाडा परिसरात एका इसमावर कारवाई करून त्याच्याकडून पाच लिटर दारू चा साठा हस्तगत करण्यात आला आहे. तसेच पेंधर परिसरातूनही अकरा हजार रुपये किमतीचा मद्य साठा हस्तगत करण्यात आला आहे. या धडक कारवायामुळे विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## खारघर रेल्वे स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर रेल्वे स्टेशन परिसरात फुटपाथ वर एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खारघर पोलीस करीत आहेत.

सदर अनोळखी इसमाचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्ष, रंग गहूवर्णीय, उंची ५ फूट ४ इंच, चेहरा गोल, केस वाढलेले असून अंगात फिक्कट रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट तसेच पायात काळ्या रंगाची सॅन्डल घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने खारघर पोलीस ठाणे किंवा सपोनि निशांत धनवडे यांच्याशी संपर्क साधावा.

## प्रा.प्रशांत शेळके ज्ञानज्योती पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पेण**

आविष्कार फाउंडेशन इंडिया तर्फे 'ज्ञानज्योती पुरस्काराने' प्राध्यापक प्रशांत शेळके यांना माजी जिल्हाधिकारी व अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांनी त्यांच्या पत्नी सौ रूपाली शेळके यांच्या समवेत स्वीकारला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी, पुणे या ठिकाणी करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर अविष्कार फाउंडेशनचे सर्वेसर्वा संजय पवार, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.कुराडे आदींसह मान्यवर उपस्थित होते. प्रा.प्रशांत शेळके यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कामाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. प्रा.प्रशांत शेळके हे श्री छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वावोशी येथे कार्यरत आहेत. हा सन्मान मिळाल्याबद्दल त्यांचे प्रा.संपतजी गर्जे, ऐश्वर्या ठोंबरे, प्राचार्य एम.एम.शेरखाने, एस.एम.मोरे, विजय ठाकरे, स्वप्नाली जाधव, विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# मुंबई गोवा महामार्गावरील भंगाराच्या गोदामात रात्रीची जाळपोळ, प्रदूषित धुव्यात गुदमरतोय भिरा फाटा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई गोवा महामार्गालागत गेली अनेक वर्षे वरसगाव भिरा फाटा, कोलाड, पुई,पुगाव,खांब, दरम्यान ठिये मांडून वसलेले अनेक भंगारांचे साठे व गदामे असून सदरच्या गोदामात अनेक प्रकारचा व विविध स्वरूपाचा भंगाराचा साठा केला जात असून या काही विशिष्ट प्रकारच्या केमिकल मिश्रित रासायनिक भंगाराची मध्य रात्रीच्या सुमारास जाळपोळ केली जात असून याचा या जलपोलीमुळे व प्रदूषित होत असलेल्या काळेभोर धुव्यामुळे सदरचा वस्तीतील नागरिकांना मोठा सामना करावा लागत आहे तर पर्यावरणात धोका निर्माण होत असून हवेत प्रदूषित होत असलेला धूर लगतच्या ग्रामस्थांना हानिकारक ठरत असल्याचे सर्वत्र बोलले जात असून दुर्गंधीच्या प्रमाणात देखील वाढ होत असल्याचे वरसगाव नाका भिरा फाटा तसेच कोलाड खांब परिसरात याबाबत चिंता व्यक्त करत बोलले जात आहेत .



मुंबई गोवा महामार्गलगत वरसगाव भिरा फाटा,कोलाड,पुई,पुगाव, खांब दरम्यान मोठं मोठे भंगाराच्या साठ्याला जबाबदार कोण? सदरच्या ग्राम पंचायत मधून सदरच्या जागेतील भंगार गोदामाला परवांगी आहे का असा देखील सवाल येथून रहदारी करणाऱ्या नागरिकांच्या डोळ्यासमोर उभार राहिला आहे .मागील दोन तीन वर्षपूर्वी कोलाड खांब मार्ग या परिसरातील एका भंगार गोदामाला अचानक आग लागली असता सदरील आगीने मोठे रुद्ररुप धारण केले आगीचा मोठा तांडव निर्माण झाले सर्वत्र एकच खळबळ उडत हा हा कार माजला होता तर प्रसंगी यावेळी रोहा, महाड, खोपोली, येथील अग्निशमन दलाच्या गाड्या बोलवण्यात आल्या होत्या व त्यांच्या अथक प्रयत्नानंतर तातकालीन ती आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना तब्बल चार ते पाच तासाहून अधिक वेळ लागला तद्नंतर ती आग आटोक्यात आली हे उदाहरण समोर असून देखील पुन्हा गेली अनेक वर्षे या मार्गलगत गाव शेजारी हेच प्रकार या भंगार गोदामात घडत आहेत त्यामुळे पुन्हा धोक्याचा प्रसंग उद्धभवण्याची चिन्ह निर्माण होण्याचे चिन्ह दिसत आहे.

मुंबई गोवा मार्गावरील वरसगाव कोलाड खांब नागोठणे हायवे लगत असलेले भले मोठे भंगारांचे गोदाम यात अनेक प्रकारच्या भंगाराचा साठा केला जात आहे काही भंगार साठ्यातून वायू प्रदूषित होऊन त्याचे हवेत प्रदूषण होत पर्यावरणाला धोका तर मानविजीवणावर त्याचा परिणाम होत आहे तर रात्रीच्या सुमारास भंगार साठ्याच्या नजीक होत असलेली जाळपोलीमुळे मोठा अनर्थ होऊ शकतो आणि काही क्षणातच मोठा धोका निर्माण होऊ शकतो असे सर्वत्र बोलले जात आहे.

साठा करून ठेवत असलेले विविध प्रकारचे भंगारात प्लास्टिक ,फायबर,रासायनिक रिकामे ड्रम, रबर,लाकूड, लोखंड, एक ना अनेक प्रकारचे स्क्रॅप भंगार या ठिकाणी जमा करून त्याची जाळपोळ करत विलेवाट लावली जाते तर भल्या मोठ्या लोऱ्या च्या लोऱ्या दिवसा व रात्रीच्या सुमारास खाली करून त्या भरल्या जातात यावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही यावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे .या साऱ्या खुले आम होत असलेल्या प्रकाराला जबाबदार कोण हे ठिय्ये अधिकृत की अनधिकृत आहेत यावर देखील मोठा प्रश्न निर्माण होत आहे. तर राष्ट्रीय महामार्गवर हे ठिय्ये असल्याने त्या परिसरात रात्रीच्या सुमारास बेधडक जाळपोळ होत असल्याने ये जा करणाऱ्या प्रवाशी वर्गाला त्याच्या होत असलेल्या दुर्गंधीमुळे व प्रदूषणामुळे नाक मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे .

तरी सदरील या गोष्टीचा संबधीत वर्गाने याचा गांभीर्याने विचार करून सदरील भंगार साठा गोदामात होत असलेली कचरा कुंडीचा जाळपोळ प्रक्रिया थांबवण्याचे आदेश देण्यात यावी अशी मागणी प्रवासी नागरिक व पर्यावरण प्रेमी यांच्याकडून केली जात आहे आहे.

## तळा कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, गो. म वेदक विद्यामंदिर व प्राथमिक विभागाच्या वतीने दिनांक २६/ नोव्हेंबर, २०२२ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात संविधान दिन साजरा करण्यात आला.यावेळीसंविधान दिनाचे औचित्य साधून तळा कॉलेज, कासार आळी, नगरपंचायत, बाजारपेठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बळीचा नाका ते परत कॉलेज अशी रॅली काढण्यात आली. यावेळी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, नगराध्यक्षा सौ अस्मिता भोरावकर, सर्व नगरसेवक व नगरसेविका, तळा पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे, चंद्रकांत खातू, प्राचार्य डॉ भगवान लोखंडे, प्रभारी मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, डॉ. दत्ता कुंटेवाड, शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.


यावेळी २६/११ च्या हल्लयात शहीद झालेले पोलीस अधिकारी व जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. व सनिविधानाच्या उद्देशिकेचे डॉ. दिवाकर कदम यांनी वाचन केले तर मयुरी साळवी या विद्यार्थिनीने संविधान गीत सादर केले. तद्नंतर प्राचार्य डॉ. भगवान लोखंडे यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका - स्वरूप व तत्वज्ञान या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. रॅलीदरम्यान तळा नगरपंचायत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बळीचा नाका येथे नगरसेवक प्रकाश गायकवाड यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे, प्रा.पोपट कसबे यांनी संविधानाचे महत्व सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. दत्ता कुंटेवाड तर निवेदनप्राध्यापक पाटील एन सी व सुहास वावेकर यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, तळा नगरपंचायतीचे नगरसेवक, पोलीस, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पेणमध्ये रांगोळी, शिल्प, मूर्ती आणि चित्रांचा कलाविष्कार

**दै.रायगड नगरी । पेण**

जगप्रसिद्ध असणाऱ्या गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात आज आणखी काही कलेचे नमुने याची देही याची डोळा पाहायला मिळाले. आज पेण शहारातील रामेश्वर मंदिरात भरविण्यात आलेल्या रामेश्वर कला महोत्सवात रांगोळी कला, शिल्प कला, गणेशमुर्ती कला आणि हाताने बनविलेल्या गणेशमूर्तींचा कलाविष्कार एकाच ठिकाणी कला रसिकांना पहायला मिळाला.

निमित्त होते पेण मधील सुप्रसिद्ध चित्रकार जितेंद्र गायकवाड यांनी भरविलेले गणेश मूर्ती, रांगोळी, चित्र आणि शिल्प यांचे विक्री, प्रदर्शनआणि स्पर्धा. रविवार २७ नोव्हेंबर पर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात रायगडसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग,



ठाणे, मुंबई आदी ठिकाणांहून शेकडो हुन अधिक स्पर्धक, कलाकार आणि रसिक प्रेक्षकांनी सहभाग घेतला आहे.


या शिबिराबाबत बोलताना आयोजक चित्रकार जितेंद्र गायकवाड यांनी सांगितले की, स्थानिक मूर्तिकार, चित्रकार, शिल्पकार आणि रांगोळी तून आपली कला सादर करणाऱ्या कलाकारांना एक चांगले व्यासपीठ मिळावे तसेच त्यांची कला रसिकांसोबत ओळख व्हावी हा उद्देश असून, तसेच मधले अंतर कमी व्हावे आणि त्यांना व्यावसायिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन कसे होईल यासाठी नामवंत कलाकारांचे प्रात्यक्षिक सादर करुन एक चांगली संधी निर्माण करुन देण्याच्या उद्देशाने हे प्रदर्शन आणि स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्याचे सांगितले. रांगोळी स्पर्धेत भाग घेणारे कलाकार केदार टेमकर यांनी पूर्वीची धार्मिक संस्कृती या मोबाईलच्या युगात लोप पावत चालली आहे, ती संस्कृती, त्या वेळचा पेहराव आणि त्यावेळचा आयुर्वेद याची आठवण आत्ताच्या पिढीला करुन देण्याच्या उद्देशाने मी रांगोळी काढली असल्याचे सांगितले.

## प्राणीमित्र कुमार देशपांडे आणि डॉ.राजे यांनी अपघातात जखमी गायीवर केली यशस्वी शस्त्रक्रिया

**दै.रायगड नगरी । रोहा**

तालुक्यातील धाटाव येथिल अपघातात अज्ञात वाहनाच्या धडकेने जखमी झालेल्या गाईवर प्राणीमित्र कुमार देशपांडे आणि तांबडी येथे डॉ. सन्मित राजे यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून गायीचे प्राण वाचविले आहेत.

रोहा कोलाड मार्गावर धाटाव येथे गायीला अज्ञात वाहनचालकाने जोरदार धडक दिली. अपघातानंतर अज्ञात वाहन चालकाने घटना स्थळावरून पलायन केले. या अपघातात गाय गंभीररीत्या जखमी झाल्याने तिच्यावर तातडीने उपचार करणे गरजेचे होते. याबाबत माहिती मिळताच सर्प, पशु पक्षी, वृध्द सेवा मंडळाचे अध्यक्ष प्राणीमित्र कुमार देशपांडे हे गायीच्या मदतीसाठी धावून आले, त्यांनी गायीवर



प्राथमिक उपचार केले. या गायीची गंभीर जखमी अवस्था पाहता गायीवर तातडीने शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते, परिणामी गायीवर तांबडी येथे शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेथे डॉ. सन्मीत राजे यांच्या मार्गदर्शनाखाली कुमार देशपांडे, अनिकेत पाडसे, अक्षय देशमुख, नीरज म्हात्रे, परेश साळुंखे, अनुज पाडसे तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी मिळून गायीवर शस्त्रक्रिया केली. अत्यावश्यक वेळी गायीवर यशस्वी शस्त्रक्रिया झाल्याने तीला जीवनदान मिळाले आहे. सर्प, पशु पक्षी, वृद्धांची सेवा करणारे कुमार देशपांडे आणि त्यांच्या सहकारी प्राणीमित्रांचे रोहयात सर्वत्र कौतुक होत आहे. देशपांडे व सहकारी यांच्याकडून सातत्याने होत असलेल्या सेवाभावी कार्याचे रोहा सिटीझन फोरमच्या पुढील कार्यक्रमात यथोचित सन्मान करण्यात येईल असे नितिन परब व आप्पा देशमुख यांनी सांगितले आहे.

## बंजारा समाजातील सर्वसामान्य मजूर कुटुंबांना मोफत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील बंजारा समाजातील सर्वसामान्य मजूर कुटुंबांचा राहण्याचा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी सोडवावा अशी मागणी कळंबोली येथील रासपचे पवन काळे यांनी केली आहे. त्यामुळे बंजारा तांडा (वस्ती) निर्माण करण्यासाठी मोफत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. बंजारा समाज वर्षानुवर्ष मुंबई, नवी मुंबई, पनवेलमध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून गाव खेड्यांमधून मजूर वर्ग कामधंद्याच्या शोधात मजुरी करण्याच्या उद्देशाने आलेला आहे. गेले कित्येक वर्ष बंजारा समाज भाडे तत्वावर व कुठेही आपले ठाण मांडून उघड्यावर जीवन जगत आहे. हा समाज मुंबई, नवी मुंबईमध्ये विखुरलेला आहे. नवी मुंबई व पनवेल तालुक्यात जवळपास बंजारा समाजाची लोकसंख्या ५० हजार आहे. कोरोना काळापासून रोजगार व व्यवसाय ठप्प आहेत. त्यामुळे रोजंदारी करून खायचे की घर भाड्याने घेऊन राहायचे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे बंजारा समाजातील सर्वसामान्य मजूर कुटुंबांना वस्ती निर्माण करण्यासाठी मोफत जागा उपलब्ध करून देण्याची मागणी पवन काळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## पोलीस भरतीसाठी तरुणांनी सज्ज व्हावे : अमित शेडगे

**दै.रायगड नगरी । दिघी**

आजचं युग स्पर्धेचे युग आहे. आपण सर्वांनी योग्य नियोजन , वेळेचा सदुपयोग आणि अचूक मार्गदर्शन या त्रिसूत्रीचा वापर करून आपण आयुष्यातील प्रत्येक आव्हानावर मात करू शकतो. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कष्ट आणि चिकाटी याची नितांत आवश्यकता असते. रायगड जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली गरुड झेप उपक्रम रायगड जिल्ह्यात राबवला जात आहे. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहे. पोलीस भरतीसाठी आपण सर्वांनी सज्ज असले पाहिजे . रायगड प्रशासन आपणा सर्वांच्या समवेत आहे असे प्रतिपादन अमित शेडगे प्रांताधिकारी श्रीवर्धन यांनी केले आहे.



श्रीवर्धन प्रांत कार्यालयाच्या सभागृहात गरुड झेप रायगड जिल्हा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या माध्यमातून श्रीवर्धन तालुक्यातील तरुणांसाठी पोलीस भरती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले सदर प्रसंगी प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी उपस्थित तरुणाईला मार्गदर्शन केले. शिबिर प्रसंगी तहसीलदार श्रीवर्धन सचिन गोसावी, परिविक्षाधीन तहसीलदार विनायक घुमरे, श्रीवर्धन पोलीस स्टेशनच्या महिला अधिकारी श्रीमती कविता देवर्डेकर, माजी सैनिक व सध्या श्रीवर्धन येथे तलाठी म्हणून कार्यरत असलेले बाळकृष्ण भामरे यांनी पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करणे तसेच शारिरीक चाचणी व लेखी चाचणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस भरतीसाठी आवश्यक असलेले विविध दाखले उमेदवारांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात आले. तसेच पोलीस भरती विषयक पुस्तके उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांनी परीक्षेच्या अभ्यासासाठी गरुडझेप पचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. या शिबिराला पोलीस भरतीसाठी इच्छुक उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## राष्ट्रीय बाल विज्ञान स्पर्धेत महात्मा गांधी शाळेची राज्यस्तरीय स्पर्धेत बाजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय बाल विज्ञान स्पर्धेची जिल्हास्तरीय फेरी नुकतीच संपन्न झाली. यात उरण तालुक्यातील दिघोडे येथील महात्मा गांधी शाळेतील विद्यार्थिनींनी बाजी मारली आहे. रानभाज्यांचे आरोग्यदायी महत्त्व हा प्रकल्प या विद्यार्थिनींनी सादर केला होता. या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

तिसाव्या राज्यस्तरीय राष्ट्रीय बालविज्ञान स्पर्धेच्या विविध फेऱ्या संपूर्ण राज्यातून घेण्यात येत आहेत. यात उरण तालुक्यातील दिघोडे येथील महात्मा गांधी शाळेतील नववीच्या विधी विलास नवाळी आणि भूमिका नामदेव नवाळी या विद्यार्थिनींनी सादर केलेला 'दुर्मिळ रानभाज्यांचे महत्व पाककृतीतून विशद करणे' या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली आहे. यासाठी शिक्षिका श्रीमती वंदना बडगुजर यांचे ,मार्गदर्शन तर प्राचार्य एन. एन. नाईक यांचे प्रोत्साहन लाभले.

शाळेला मिळालेल्या यशाबद्दल प्राचार्य एन. एन. नाईक यांनी विद्यार्थिनी आणि मार्गदर्शक शिक्षिका यांचे कौतुक करून पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात संविधानदिन साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व डी. एल.एल.इ.यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ नगरबावडी यांच्या अध्यक्षतेखाली संविधानदिन साजरा करण्यात आला.२६ नोव्हेंबर हा दिवस देशभरात संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

यावेळी प्राचार्या डॉ.नगरबावडी, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे, प्रा.डॉ.मुरलीधर गायकवाड, प्रा.डॉ.मधुकर वेदपाठक, प्रा.डॉ.जे.के. कांबळे,



प्रा.डॉ.मुनेश्वर, प्रा.डॉ.सीमा वाहीद, प्रणव बागवे व विद्यार्थी उपस्थित होते. सुरुवातीला संविधानकार महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रा.डॉ.जनार्दन कांबळे यांनी संविधान प्रास्ताविकाचे वाचन करून संविधान दिनाचे महत्त्व पटवून दिले. प्रा.डॉ.मधुकर वेदपाठक यांनी भारतीय घटनेची निर्मिती कशी झाली, राज्य घटनेची उद्देशिका व वैशिष्ट्ये यावर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच २६/११ दहशतवादी हल्लयातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सुत्रसंचालन प्रा.डॉ.बागुल यांनी तर प्रा. डॉ.म्हात्रे यांनी आभार मानले.

## उरण तालुक्यात गोवर आजाराचा एकही रुग्ण नाही मात्र खबरदारी घेणे गरजेचे

### उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**

गोवर हा विषाणू मुळे होणारा संसर्गजन्य आजार असून या आजाराने मुंबईमध्ये थैमान घातले असून या आजाराने रायगड जिल्ह्यात पनवेल तालुक्यात प्रवेश केला आहे. मात्र पनवेल तालुक्याला लागून असलेल्या उरण तालुक्यात गोवर आजाराचा एकही रुग्ण आढळून आला नाही. मात्र सर्वांनी योग्य ती खबरदारी व आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे असे आवाहन उरण तालुका आरोग्य अधिकारी राजेंद्र इटकरे यांनी केले आहे.

वाढत्या गोवर आजाराच्या प्रादुर्भावाबाबत माहिती देताना इटकरे यांनी सांगितले की गोवर हा विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. रुग्णाच्या संपर्कात आल्या नंतर १० ते १२ दिवसा नंतर त्याची लक्षणे दिसतात. ताप खोकला, वाहणारे नाक, डोळ्याची जळजळ इत्यादी गोवर आजाराची लक्षणे आहेत. ज्यांना कोणाला गोवर आजाराची लक्षणे आढळली आहेत अशा नागरिकांनी आपल्या लहान मुलांना त्वरित नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा शासकीय रुग्णालयात दाखल करावे. जेणेकरून गोवर आजारावर योग्य वेळेत उपचार होईल.व गोवर आजार आटोक्यात येईल.उरण तालुक्यात गोवरचा एकही रुग्ण नाही मात्र सर्वांनी योग्य ती खबरदारी घ्यावे. असे आवाहन उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेंद्र इटकरे यांनी केले आहे.